Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

# AJANTA







Volume - VII, Issue - IV, October - December - 2018
ISSN 2277 - 5730
Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

MARATHI PART - I

Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - I


| Sr. No. | Name & Author Name | Page No. |
|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य<br>**प्रा. प्रसन्न बगडे** | १-२ |
| २ | राष्ट्रसंताचा वैज्ञानिक दृष्टीकोन<br>**रविंद्र गोविंदराव बावने** | ३-८ |
| ३ | ग्रामस्वच्छता व रामधून एक ग्राम जागृतीची चळवळ<br>**डॉ. प्रा. बिसमिल्ला खॉन सरफराज खॉन** | ९-११ |
| ४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि मानवतावाद<br>**प्रा. डॉ. रजनी बोबडे** | १२-१८ |
| ५ | तुकडोजी महाराज आणि राष्ट्रवाद<br>**प्रा. डॉ. गोपाल ढोले** | १९-२४ |
| ६ | राष्ट्रसंताचे स्त्री सबलीकरण व महिलोन्नती विषयक विचार<br>**डॉ. पौर्णिमा भा. गंथडे** | २५-२८ |
| ७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून मांडलेला विश्वशांतीचा विचार<br>**प्रा. डॉ. प्रमोद भी. घारोडे** | २९-३६ |
| ८ | राष्ट्रसंतांची राष्ट्र उभारणीची चळवळ<br>**डॉ. बबन सिद्राम गायकवाड** | ३७-३९ |
| ९ | राष्ट्रसंतांचा संगीत विषयक दृष्टीकोन<br>**प्रा. प्रशांत झि. बागडे** | ४०-४१ |
| १० | ग्रामगीतेतील जीवनमूल्यविषयक विचार<br>**प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे** | ४२-४६ |
| ११ | ग्रामगीतेतील जीवनमूल्ये विषयक विचार<br>**डॉ. कार्तिकी विजयकुमार नांगरे** | ४७-४९ |
| १२ | राष्ट्रसंतांची भाषा व साहित्यविषयक दृष्टी<br>**प्रा. डॉ. मंदाकिनी अरविंद मेश्राम** | ५०-५३ |




Scanned by CamScanner

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य

**प्रा. प्रसन्न बगडे**
इतिहास विभाग प्रमुख, श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी, अकोला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म अमरावती जिल्हयातील यावली या गावी ३० एप्रील १९०९ रोजी झाला त्यांच्या वडीलांचे नाव बंडोपंत व आईचे नाव मंजुळा होते. तुकडोजी महाराज यांना राष्ट्रसंत म्हणुन ओळखले जाते. अंधश्रध्दा निर्मुलन व जातिभेदाच्या निर्मुलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ग्रामगीता या काव्यातून मांडले. त्यांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्टये होते.

तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. आडकोजी महाराज हे त्यांचे गुरु. त्यांनी त्यांचे मुळचे माणिक हे नाव बदलून तुकडोजी असे केले. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्राभरच नव्हे देशभर हिंडुन ते आध्यत्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधूत्वाचा संदेश दिला. सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनादरम्यान काही काळ त्यांना अटक झाली होती. "आते है नाथ हमारे" हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वातंत्र्यलढयासाठी स्फुर्तिगाण ठरले होते.

भारत हा खेडयांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रध्दा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उध्दार कसा होईल, याविषयी त्यांनी अहर्निश चिंता केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदुच होता. भारतातील खेडयांच्या स्थितीची त्यांना पुरेपुर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभुतस्वरुपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात, याविषयी उपाययोजनाही सुचविली. या उपाययोजना त्यांच्या काळाला तर उपकारक ठरल्याच पण त्यानंतरच्या काळालाही उचित ठरल्या.

अमरावतीजवळ मोझरीच्या गुरुकूंज आश्रमाची स्थापना हे तुकडोजींच्या आयुष्यातील जसे लक्षणीय कार्य आहे. त्याचप्रमाणे ग्रामगीतेचे लेखन हाही त्यांच्या जीवनकार्यातील अत्यंत महत्वाचा टप्पा आहे. ग्रामगीता ही जणु तुकडोजी महाराजांच्या वाडमयसेवेची पूर्तीच होय. स्वत:ला ते तुकडयादास म्हणत कारण भजन म्हणताना ते जी भिक्षा घेत, त्यावरच आपण बालपणी जीवन कंठिले, हयाची त्यांना जाणीव होती.

खेडेगाव स्वयंपुर्ण कसे होईल, याविषयीची जी उपाययोजना तुकडोजी महाराजांनी सुचविली होती, ती अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम हे सुशिक्षीत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळावे, प्रचारकांच्या रुपाने गावाला नेतृत्व मिळावे, असा त्यांचा



Scanned by CamScanner

प्रयत्न होता. त्यांचे प्रतिबिंब ग्रामगीतेत उमटले आहे. देवभोळेपणा, जुनाट कालबाहय अंधश्रध्दा नाहीशा व्हाव्या याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले.

सर्वधर्मसमभाव हेही या राष्ट्रसंताच्या विचारविश्वाचे एक वैशिष्टये होते. त्यासाठी तुकडोजी महाराजांनी सामुदायिक सर्वधर्मीय प्राथनेचा आग्रहपुर्वक पुरस्कार केला.

धर्मातील अनावश्यक कर्मकांडाला त्यांनी फाटा दिला होता. आपल्या प्रभावी खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारसारणीचा प्रचार करुन आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले.

महिलांची उन्नती हा ही तुकडोजी महाराजांच्या विचारविश्वाचा एक लक्षणीय पैलू होता. कुटूंबव्यवस्था समाजव्यवस्था, राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबुन असते, हे त्यांनी आपल्या किर्तनांव्दारे समाजाला पटवून दिले त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व दास्यात ठेवणे कसे अन्यायकारक आहे, हे त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पटवून दिले.

ऐहिक व पारलौकिक यांचा सुंदर समन्वय तुकडोजी महाराजांच्या साहित्यात झाला आहे. त्यांनी मराठीप्रमाणेच हिंदी भाषेतही विपुल लेखन केले. आजही त्यांचे हे साहित्य आपल्याला मार्गदर्शन करीत आहे. यावरुन त्यांच्या साहित्यात असा वाङमयाची मूल्ये कशी दडली आहेत, याची सहज कल्पना येईल. राष्ट्रपतिभवनात झालेले त्यांचे खंजिरी भजन ऐकून राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत म्हणुन संबोधिले होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे चीन युध्द १९६२ व पाकिस्तान युध्द १९६५ झाले तेव्हा सैन्यास धीर देण्यासाठी स्वतः सीमेवर जाउन वीरगीते गाईली, व सैन्याचे धैर्य वाढविले. ते फार प्रयत्नवादि होते. तन, मन, धनाने त्यांनी राष्ट्राची सेवा केली ते खरे राष्ट्रसंत होऊन गेले.

**संदर्भ ग्रंथ सुची**

१) डॉ. सुभाष सावरकर, राष्ट्रसंत तुकडोजी : जीवन व कार्य, - राही प्रकाशन

२) www.wikipedia.org

३) www.marathi-unlimited.in

४) www.amravati.gov.in

Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERN!TION!L RESE!RCH FELLOWS !SSOCI!TION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2019

SPECIAL ISSUE-

## Reformation in the Age of Shivaji

## शिवकाळातील सुधारणा



**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Anil N. Thakre
Hod-History
Shri Gadge Maharaj Mahavidyalaya,
Murtizapur. Dist -Akola [M.S.]

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
January 2019

## INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | मराठा सत्तेच्या उभारणीत मुस्लीम आणि दलितांचे योगदान | प्रा. पी. ए. टाले | 5 |
| 2 | शिवरायाचा स्त्री विषयक दृष्टिकोन | डॉ. शारदा बंडे | 8 |
| 3 | शिवकालीन ग्रामीण प्रशासन व्यवस्था | प्रा. संदीप व्ही. भुरले | 11 |
| 4 | शिवकालीन महसूल पध्दती ऐतिहासिक अध्ययन | डॉ. नितीन व. चांगोले | 15 |
| 5 | छत्रपती शिवाजी महाराजाची लष्करी व्यवस्था व सुधारणा | प्रा. भोसले राजेसाहेब | 18 |
| 6 | शिवकालीन शेतीविषयक सुधारणा | सहा. प्रा. राजेंद्रसिंग हिरासिंग देवरे | 21 |
| 7 | जनकल्याणकारी, प्रजाहितदक्ष, द्रष्टाराजा – छत्रपती शिवाजी महाराज | डॉ.ओमप्रकाश बोबडे | 27 |
| 8 | मराठेकालीन सती प्रथा-एक अभ्यास | प्रा.गंगणे रतन व्यंकटराव | 30 |
| 9 | शिवाजी महाराजांची गनिमी कावा युध्दपध्दती: विशेष प्रसंग अफजलखान भेट | प्रा. डॉ. कैलास जे. गायकवाड | 33 |
| 10 | शिवकालीन प्रांतिक व स्थानिक न्यायव्यवस्था | श्री. हरिदास मंगरू वाकुलकर | 36 |
| 11 | शिवाजीच्या लष्करी व्यवस्थेची वैशिष्टये | प्रा.डॉ. रामधन उ.हिरे | 40 |
| 12 | शिवकालीन गड-कोट अथवा किल्ले व्यावस्थापणातील छत्रपती शिवरायांचीभुमिका एक अभ्यास | डॉ.इंगळे चत्रभुज बंकटराव | 42 |
| 13 | मराठी साम्राज्याच्या उभारणीमध्ये शिवाजी महाराजांच्या परराष्ट्र धोरणाचे महत्व | प्रा.डॉ.संतोष एस.इंगोले | 46 |
| 14 | शिवकालीन जलव्यवस्थापन आणि आजची परीस्थिती | प्रा. डॉ. सिद्धार्थ भ. जाधव रूपेश राहूल तागडे | 48 |
| 15 | छत्रपती शिवाजी राजांच्या स्त्री - विषयक दृष्टीकोण -एक ऐतिहासिक विश्लेषण | प्रा.डॉ.पी.आर.जुनघरे | 53 |
| 16 | शिवकालीन आरमार : एक अभ्यास | प्रा.डॉ.कदम संतोष तुकाराम | 56 |
| 17 | शिवरायांची युध्दनिती | प्रा.डॉ.कोकीळा अ. गांवडे | 61 |
| 18 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेती सुधारणा | प्रा. एस.जी. कुळकर्णी | 64 |
| 19 | विजापूरच्या आदिलशाहीसोबत शिवाजी महाराजांची युध्दनीती | प्रा. डॉ. निलय देशमुख | 67 |
| 20 | शिवरायांचे अष्टप्रधानमंडळ | प्रा. डॉ. श्रीहरी रंगनाथराव पितळे | 71 |
| 21 | शिवजीचे आरमार व शिस्त | प्रा. प्रविण ना. वानखडे | 74 |
| 22 | शिवकालीन औद्योगिक व व्यापारी केंद्राचे ऐतिहासिक अध्ययन | प्रा. प्रसन्न बगडे | 77 |





Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
January 2019

# शिवकालीन औद्योगिक व व्यापारी केंद्राचे ऐतिहासिक अध्ययन

सहा.प्रा. प्रसन्न बगडे
इतिहास विभाग प्रमुख,श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी,अकोला.

प्रस्तावना:—

मध्ययुगीन काळातील १६वे शतक आधुनिक भारताची नांदी ठरले, त्याला महत्वपूर्ण कारण म्हणजे औद्योगिकरण होय. औद्योगिकरणाचा अपरोक्ष परिणाम म्हणजे तत्कालीन महाराष्ट्रातील प्रामुख्याने शिवकाळातील झालेला औद्योगिक व व्यापारी केंद्राचा झालेला विकास होय.

कोणत्याही राज्याच्या विकासाचा मूलभूत आधार हा तेथील औद्योगिक परिस्थिती व व्यापारी केंद्राच्या उन्नतीवर अवलंबून असतो. शिवकाळात उदयाला आलेली व मान्यता पावलेली व्यापारी केंद्रे त्या काळाचे महत्व अधोरेखित करतात.

प्रस्तुत शोधनिबंधातुन शिवकाळातील औद्योगिक व व्यापारी केंद्राचा ऐतिहसिक आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. तरी ढोबळमानाने खालील उद्दिष्टांवर प्रस्तुत शोध निबंधाची रचना केलेली आहे.

उद्दिष्टे:—

१) शिवकालीन औद्योगिक व व्यापारी केंद्राचे ऐतिहासिक अध्ययन करणे.
२) शिवकालीन औद्योगिक व व्यापारी केंद्राचे स्वरुप अभ्यासणे.
३) शिवकालीन औद्योगिक व व्यापारी केंद्राचा तत्कालिन अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.
४) आयात निर्यात व्यापाराच्या अनुषंगाने औद्योगिक व व्यापारी केंद्राचे योगदान अधोरेखित करणे.

अ समुद्र किनाऱ्यावरील औद्योगिक व व्यापारी केंद्रे:—

मध्ययुगीन महाराष्ट्र प्रथम मुस्लिम सत्ताधिशांच्या वर्चस्वाखाली होता आणि त्यानंतर मराठा सत्ताधिशांच्या अंमलाखाली होता. शिवकाळात कोकण प्रदेश व्यापारासाठी भरभराटीला आलेला प्रदेश होता. इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्डसमध्ये चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ला, पेण, डहाणू, तारापूर, केळवा—माहिम, आगाशी, वसई, बांद्रा, माहिम, नागोठाणा, श्रीवर्धन, जैतपूर आणि खारे पाटण ही कोकाण किनाऱ्यावरील बंदरे शिवकाळात अतिशय भरभराटीला आलेली होती. तथापी यातील आगासी, वसई, बांद्रा, माहिम व श्रीवर्धन ही बंदरे शिवाजी महाराजांच्या ताब्यात नव्हती. शिवाजी महाराजांच्या ताब्यात असणारी कोकण किनाऱ्यावरील व्यापारी बंदरे पुढीलप्रमाणे होती.

१) चौल:—

अलिबाग तालुक्यातील चौल हे बंदर शिवकाळात व्यापाराकरिता भरभराटीला आलेले एक महत्वाचे बंदर होते. त्याची लोकसंख्याही जास्त होती. हे एक गर्दीचे बंदर होते. सन १६७० मध्ये ते शिवाजी महाराजांच्या ताब्यात आले. डिसेंबर ते मार्च या दरम्यान येथील व्यापार अतिशय जलद होत असे आणि मलबार व इतर ठिकाणाहून येणारी अनेक जहाजे त्याला भेट देत असत. मलबार येथून येणारी जहाजे मसाले, सुपारी, नारळ, औषधे, ताडगूळ, मेण, पारा, हिंगुळ, तांबे हा व्यापारी माल लादून येत असत. या वस्तुंना येथे मोठी मागणी होती आणि यातील काही वस्तू काही वेळा खंबायतला व गुजरातला नेण्यात येत असत. मलबारी व्यापारी येथून परतीच्या प्रवासात येथून मोठया प्रमाणावर कापड, गहू, धान्य, तलम मलमल व सुती कापड नेत असत. व्यापारी लोक येथून विणलेले कापड व मलमल अरबस्थान व इराणाला येथून नेत असत.

२) दाभोळ:—



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
January 2019

दाभोळ हे कोकणातील वसिष्ठी नदीच्या मुखाच्या उत्तर किनाऱ्यावर वसलेले एक महत्वाचे बंदर होते. मध्ययुगीन काळामध्ये तेथेही व्यापार भरभराटीला आला होता. पूर्व आफ्रिका, अरबस्तान व इराण या देशाबरोबर दाभोळचे व्यापारी संबंध होते. दाभोळला मक्का एडन येथून येणारी अनेक जहाजे भेट देत असत. तसेच खंबायत, दीव व मलबार येथूनही तांबे, पारा व हिंगुळाच्या लाल रंग यांनी भरलेली जहाजे येत असत. या वस्तू देशांतर्गत भागामध्ये विक्री व वितरणासाठी पाठविल्या येत असत. देशांतर्गत भागामधून बरेचसे कापड, गहू, धान्य व डाळी या वस्तू नदीवाटे बंदरात येत असत व तेथून पुढे विविध देशांना निर्यात केल्या जात असत.

विल्यम फॉस्टर लिखित "English Record on Shivaji" सन १६६२ मध्ये दाभोळ बंदर शिवाजी महाराजांच्या अंमलाखाली आले आणि शिवाजी महाराजांची व्यापारी जहाजे दाभोळ ते मुंबई दरम्यानच्या सागरामध्ये व्यापाराच्या निमित्ताने संचार करु लागली. दाभोळहून मुंबई येथे ईस्ट इंडिया कंपनीला मिरे, लाख आणि सुरतेपेक्षा कमी भावात जाडेभरडे कापड या वस्तू विकल्या जात असत. दाभोळच्या मलबार व खंबायत बरोबरसुध्दा व्यापार चालत असे.

३) कल्याण व भिवंडी:–

"English Record on Shivaji" या ग्रंथात विल्यम फॉस्टर म्हणतो ''कल्याण हे १७व्या शतकातील एक महत्वाचे शहर होते आणि या शहरात हिंदुस्थानच्या सर्व भागातून तसेच गोवळकोंडा व कोरमंडेल या प्रदेशातून व्यापारी माल येत असे. डॉ.फ्रायर हा इंग्रज प्रवासी म्हणतो की, मुंबईमार्गे शिवाजी महाराजांच्या प्रदेशात प्रवेश करण्याचे कल्याण हे प्रवेशद्वारच होते.

कल्याणला लागुन असलेले भिवंडी हे एक १७व्या शतकातील महत्वाचे व्यापरी केंद्र होते. त्याठिकाणी विणकामाचा उद्योग जोरात चालत असे. "English Factory Record" मधील संदर्भानुसार मुंबईकर इंग्रजांनी भिवंडी येथील विणकरांना मुंबईला आपला उद्योग आणण्याची विनंती केली होती. परंतु या विणकरांनी त्यास नकार दिला होता. मात्र विणलेले भरपूर कापड पुरविण्याचे त्यांनी इंग्रजांना आश्वासन दिले.

"English Factory Record on Shivaji" या ग्रंथातील संदर्भानुसार कल्याण व भिवंडीच्या परिसरात जहाजांना व इमारतींना लागणारे लाकूड मोठया प्रमाणात मिळत असे. इंग्रज लोकांनी या लाकडाला 'ओक' असे नाव दिले होते. मुंबईकर इंग्रजांना जहाबांधणीकरीता लाकडाची मोठया प्रमाणावर गरज भासत असे व स्वस्तात आणि जवळपास असे लाकूड कल्याण–भिवंडीशिवाय कोठेही नव्हते. तोफा वाहून नेण्याकरिता बनविण्यात येणाऱ्या गाडयासाठीही इंग्रजांना या लाकडाची गरज भासत असे. परंतु या प्रदेशाच्या मालकीसंबंधी शिवाजी व मोगल यांच्यात चाललेल्या सततच्या संघर्षामुळे इंग्रजांना असे लाकूड मिळण्यात अनेक अडचणी येत असत.

इ.स.१६७० मध्ये शिवाजी महाराजांनी मोगलांच्याकडून कल्याण व भिवंडी जिंकून घेऊन १६७० च्या दरम्यान तेथे आपला पूर्ण अंमल बसविला. कल्याण–भिवंडीच्या परिसरातील लाकडाची भरपूर उपलब्धता पाहून शिवाजी महाराजांनी तेथे जहाज बांधणीचा उद्योग सुरु केला. सभासद बखरकार म्हणतो की, कल्याण व भिवंडी येथे शिवाजी महाराज गुराबा, गलबत, सिबाड, तराडे, तारु व पगार अशी सहा प्रकारची जहाजे बांधीत असत. शिवाजी महाराजांनी आरमार बांधणीचे महत्व ओळखूनच अशा प्रकारचा उद्योग कल्याण–भिवंडी येथे सुरु केला होता.

४) राजापूर:–

राजापूर हे एक रत्नागिरी जिल्हयातील शिवकाळातील महत्वाचे व्यापारी केंद्र होते. सन १६६० मध्ये हेन्री रिव्हिंगस्टन यांच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी विजापूरच्या आदिलशहाच्या परवानगीने इंग्रजांनी राजापूर येथे आपली वखार स्थापन केली. १६६८ च्या दरम्यान फ्रेंचानीही तेथे आपली वखार भरली. शिवाजी महाराजांनी या दोन्ही परकीय व्यापाऱ्यांना तेथे व्यापार करण्याचे स्वातंत्र्य



Scanned by CamScanner

दिले होते. फ्रेंच व्यापारी तेथे लोखंड व शिसे यांचा व्यापार करीत असत. याशिवाय राजापूर येथे मूरलोक, हिंदु व इतर परकीय लोकही व्यापाराच्या निमित्ताने येऊन राहिले होते.

या बंदरातुन मिरे, वेलदोडे, सुती कापड, सोरा व सुती धागा मीठ, कागद यांचा व्यापार चालत असे. फ्रेंच प्रवासी अॅबेकॅरे हा म्हणतो की, राजापूरमध्ये असे अनेक श्रीमंत व्यापारी होते की ज्यांची मालवाहू जहाजे तांबडा समुद्र व इराण (पर्शिया) मधील वसरा याठिकाणी जात असत. तसेच या बंदरातून सर्व हिंदुस्थानात मालाचा पुरवठा होत असे.

जेव्हा राजापूर शिवाजी महाराजांच्या ताब्यात आले त्यावेळी शिवाजी महाराजांनी इंग्रजांची तेथील वखार लुटली होती. त्याच्या भरपाईबद्दलची बोलणी अनेक दिवस चालली होती. परंतु शिवाजी महाराजांनी इंग्रजांना दाद दिली नव्हती. संभाजी महाराजांनीही इंग्रजांना नुकसान भरपाई दिली नाही. शेवटी १६८२ मध्ये इंग्रजांनी राजापूर येथील आपली वखार बंद केली.

५) वेंगुर्ला:—

१७ व्या शतकातील व्यापाकरीता भरभराटीला आलेले आणखी एक शहर म्हणजे कोकणातील वेंगुर्ला हे होय. या ठिकाणी डचांची वखार होती. सन १६६० च्या दरम्यान येथे बटाव्हिया, जपान, सिलोन, इराण व अरबस्थान येथून येणारी जहाजे भेट देत असत.

वरील महत्वाच्या व्यापारी व औद्योगिक केंद्राशिवाय शिवकाळात महाड, कोल्हापुर, आष्टे, चिपळूण, केळशी, पेठा, नागोठाणे इ.अनेक शहरातून व बंदरातून व्यापार चालत असे आणि हा व्यापार ''इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्ड'' मधील संदर्भाप्रमाणे मुंबईकर इंग्रजांना सुरतेपेक्षा सोईस्कर व स्वस्त वाटत असे.

ब) अंतर्गत व्यापारी केंद्रे:—

अनेक नागरी केंद्रे व बाजारपेठा याचे अस्तित्व हे व्यापाराच्या भरभराटीकरीता आवश्यक असते. अशा अंतर्गत बाजारपेठेवर किंवा व्यापारी केंद्रावर राज्याच्या व्यापाराचे मान अवलंबून असते इतर ठिकाणाप्रमाणेच शिवकाळातील महाराष्ट्रात निरनिराळया व्यापारी केंद्राची वाढ झाल्याचे दिसते.

१) आठवडयाचे बाजार:— विविध गावात व पेठेत भरणारे आठवडयाचे बाजार ही शिवकाळातील व्यापारी केंद्रेच होती. महाराष्ट्रातील विविध गावात व शहरात आठवडयातून एकवेळ किंवा दोन वेळ असो बाजार भरत असे. आसपासच्या गावातील लोक अशा बाजारात आपला माल विकण्यासाठी आणीत असत. अशा लोकात शेतकरी, लहान लहान व्यापारी बाहेरुन आपला माल आणीत असत. तसेच स्थानिक व्यापारीही अशा बाजारात आपला माल आणीत. अशा बाजारात विविध प्रकारचे धान्य, कपडे, बेकरीतील पदार्थ, फळे व भाजीपाला, नारळ, किराणामाल अशा विविध वस्तूंची विक्री होत असे. हा आठवडयांचा बाजार खेडयातील लोकांच्या विविध गरजा भागवित असे.

२) **कसबा किंवा पेठा:**— कसबा किंवा पेठा या शिवकाळातील आकाराने मोठी असलेली व्यापारी केंद्रेच होती. पेठेला अनेक कायम स्वरुपाची दुकाने असत. यात तेलविक्री करणारे तेल गाळणारे, पादत्राणे तयार करणारे चांभार कापडाचे व्यापारी कापड तयार करणारे विणकर, कपडे शिवणारे शिंपी, दारु गाळणारे व विकणारे कलाल यांचा समावेश होत असे.

पेठेतील व्यापारावर नियंत्रण ठेवणारा अधिकारी म्हणजे शेठ हा होय. तर पेठाच्या विकासाची जबाबदारी पाटलाची असे. शेटेच्या कामगिरीबद्दल त्याला सरकारकडून करमुक्त जमीन इनाम दिली जात असे.

शिवकाळात नवीन व्यापारी पेठा वसविण्याकरीता सरकारकडून प्रोत्साहन दिले जात असे. काही वेळा सरकारकडून नवीन पेठा वसविण्यासंबंधी एखाद्या व्यक्तीला सनद दिली जात असे. पाषाण, जिजापुरा, मल्पुरा, खेळपुरा, विठापुरा अशा अनेक पेठा शिवकाळात वसविल्याचा संदर्भ मिळतो.



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
January 2019

पेठ वसविल्यानंतर काही काळाने त्या पेठेत बाहेरच्या नवीन व्यापाऱ्यांना आपला धंदा करण्याची परवानगी देऊन पेठेचा विकास करण्याचे प्रयत्न शिवकाळात झाल्याचे दिसतात. परंतु अशावेळी जुन्या व्यापाऱ्यांची व नव्या व्यापाऱ्याची वेगळी नोंद ठेवली जात असे.

सारांश:—

नवीन पेठाचा विकास शांतता व सुरक्षितता या दोन गोष्टींवर अवलंबून असल्याने शिवाजी महाराजांनी या दोन गोष्टीकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसते. ही राज्याची जबाबदारी समजली जात असे. चोर, दरोडेखोर व शत्रूचे हल्ले यांच्यापासून व्यापारांचे संरक्षण करण्यासाठी शिवाजी महाराज सतत दक्ष असत. तसेच आपल्या राजवटीत व्यापार भरभराटीला यावा म्हणून शिवाजी महाराजांनी व्यापाऱ्यांना अनेक सवलतीही दिल्या होत्या.

संदर्भसूची:—

१) सावंत बी.एस., जाधव व्हि.के.— मराठयांचा प्रशासकीय आणि सामाजिक, आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपुर.
२) Bombay gazette खंड १० पा. नं.१७५.
३) शिवचरित्र, खंड ९, प.क्र. ८५, मराठयांच्या इतिहासाची साधने खंड ८ क. ४८
४) English Record on Shivaji

# Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

University Grants Commission
UGC Approved Journal
Sl. No. 40705

## CERTIFICATE

ISSN 2348-7143

UGC Approved J.No.40705

Impact Factor 6.261 (SJIF)

*This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs./Ms.* सहा.प्रा. प्रसन्न बगडे

*Of* इतिहास विभाग प्रमुख,श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी,अकोला.

*has published a paper on* शिवकालीन औद्योगिक व व्यापारी केंद्राचे ऐतिहासिक अध्ययन

*Peer Reviewed International E-Research Journal Special Issue on "Reformation in the Age of Shivaji"*

*Published on Dated 5, January -2019.*

**Prof. Virag Gawande**
Director
Aadhar Social Research & Development Training Institute,
Amravati

**Dr.Anil N.Thakre**
HOD-History
Shri Gadge Maharaj
Mahavidyalaya,Murtizapur.
Dist -Akola [M.S.] INDIA

Scanned by CamScanner

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

Volume - VII, Issue - IV, October - December - 2018
ISSN 2277 - 5730

# AJANTA

Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. प्रसन्न बगडे

As a Recognition of the Publication of the Paper Entitled

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य

**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**Editor : Vinay S. Hatole**

Scanned by CamScanner